# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १३/०८/२०२४ (मंगळवार) सायंकाळ**

---

## मोटरसायकल चोरी करणारा आरोपी सावनेर पोलीसांच्या जाळयात

दिनांक १०/०८/२०२४ रोजी फिर्यादी नामे— मुकुल जयवंत गोतमारे, वय २४ वर्ष, रा. बोरगाव बुज ता, कळमेश्वर यांची ऋशी ठाकरे यांचे झेरॉक्स दुकानाचे समोरून **मो.सा क्र एम.एच ३१ सीयु ४६५० स्प्लेंडर प्लस मोटार सायकल किंमती ३५०००/—रू** ची कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली. अशा फिर्यादीचे तोंडी रीपोर्ट वरून पोस्टे सावनेर येथे अप क्र. ७१७/२४ कलम ३०२(२) बी.एन.एस अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

पोस्टे सावनेर येथील तपास पथक सदर गुन्हयात आरोपीचा शोध घेत पोस्टे परीसरात गस्त करीत असताना होळी चौक सावनेर येथे एक इसम हा संशयितरित्या दिसुन आला. **आरोपी अंकुश शंकर धुर्वे, वय २४ वर्षे रा आजनी ता सावनेर** त्यास थांबवुन त्याचे जवळ असलेल्या मो.सा क्र एम. एच ३१ सीयु ७६५० स्प्लेंडर प्लस चे कागदपत्राची मागणी केली असता त्याच्या जवळ मिळुन आलेले मोटारसायकलची बनावटी नंबरप्लेट असलेली मो.सा क्र एम. एच ३१ सीयु ७६५० असुन सदर गाडीचा मुळ क्रमांक मो.सा क्र एम. एच ३१ सीयु ४६५० असा असुन चोरीस गेलेल्या गाडीचे चेचिस नंबर व इंजिन नंबर हे एकच असल्याचे कागदपत्रावरून निष्पन्न झाले. सदर वाहन हे चोरीचे असल्याचे निष्पन्न झाल्याने सदर आरोपीस ताब्यात घेवुन आरोपीकडुन मो.सा क्र एम.एच ३१ सीयु ४६५० स्प्लेंडर प्लस मोटार सायकल किंमती ३५,०००/—रू. ची जप्त करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे सावनेर येथील ठाणेदार पोनि रविंद्र मानकर, पोहवा सुरेंद्र वासनिक, पोअं. अंकुश मुळे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर